॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३४० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145


**※ सुविचार ※**

पैसे मागे ठेवून मरण्यापेक्षा
जीवन श्रीमंतीत घालवावे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### वारसा

वाचन आणि संस्कृती
दोन्ही गेले लयाला
आमदारांची भाषाशैली
शोभते आहे का वयाला
एकेरी की दुहेरी ज्यांना
फरक कळेना फारसा
न वाचताच चालवलाय
यांनी शिवरायांचा वारसा

## SPOT NEWS

### शिवसेनेचा आ. गायकवाडांच्या विधानाशी संबंध नाही

● **मुंबई** – काँग्रेस गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या शीर्षकावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणारे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण, या प्रकरणात शिवसेनेची पहिली प्रतिक्रिया आली असून पक्षाने संजय गायकवाड यांची पाठराखण करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. संजय गायकवाड यांच्या अशा वक्तव्यांमुळे शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांची बदनामी होते, असे वक्तव्य शिवसेनेचे प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी केले आहे. संजय गायकवाडची जी ऑडिओ क्लीप फिरतेय, त्याची सत्यता माहिती नाही. पण संजय गायकवाडांच्या वक्तव्याशी आणि विचाराशी पक्षाचा संबंध नाही, हे त्यांचं वैयक्तिक मत, पक्ष त्याचे समर्थन करत नाही, असे प्रकाश महाजन यांनी स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे या प्रकरणात शिवसेना पक्ष आणि नेतृत्वाने हात वर केले असून यामुळे संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढल्या आहेत. संजय गायकवाड हे आमदार आहेत, त्यांनी बोलताना संयम ठेवला पाहिजे. त्यांनी वापरलेली भाषा चूक आहे. या सगळ्यामुळे एकनाथ शिंदे आणि पक्षाची बदनामी होते, हे संजय गायकवाडच्या लक्षात येत नाही. आम्ही त्यांच्या विचारांशी सहमत नाही. एका पुस्तकावरून अशाप्रकारे शिवीगाळ करणे आणि पुस्तकाची सत्यता काय आहे, हे जाणून न घेता प्रतिक्रिया देणे संयम नसल्याचे द्योतक आहे.

# आपमध्ये उभी फूट, ७ खासदार फुटले!

## भाजपचे ऑपरेशन लोटस् । अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का । आपचे दोन तृतीयांश खासदार

● **नवी दिल्ली । वीरभूमी** – अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षात उभी फूट पडली आहे. पक्षाच्या राज्यसभेतील १० पैकी ७ खासदारांनी राजीनामा देत भाजपसोबत जाण्याची घोषणा केली. पक्षाचे राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा यांनी शुक्रवारी एक पत्रकार परिषद घेत त्यांनी भाजपसोबत विलिनीकरणाची घोषणा केली. आपल्यासह राज्यसभेतील दोन तृतीयांश खासदार भाजपमध्ये जात असल्याची घोषणा चड्ढा यांनी केली. विशेष म्हणजे राघव चड्ढा यांना हटवून राज्यसभेत पक्षाचे उपनेते करण्यात आलेल्या अशोक मित्तल यांचाही यात समावेश आहे.



अवघ्या ४ वर्षांपूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत फूट पडली. एकनाथ शिंदे यांनी बंड केले. आता तसाच काहीसा प्रकार केजरीवाल यांच्या आपसोबत घडला आहे. विशेष म्हणजे या दोन्ही पक्षफुटीत केंद्रीय तपास यंत्रणा असलेल्या सक्तवसुली संचलनालयाचा (ईडी) समान धागा आहे. दरम्यान, खासदार राघव चड्ढा यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आम आदमी पक्ष आपल्या आदर्शांपासून, सिद्धांतापासून दूर गेला आहे. त्यामुळे जड अंतकरणाने पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हटले. मी चुकीच्या पक्षातील योग्य माणूस असल्याची जाणीव गेल्या काही वर्षांमध्ये झाली. आता मी आम आदमी पक्षापासून दूर जात आहे आणि जनतेच्या जवळ जात आहे, असे चड्ढा म्हणाले.

आपल्यासोबत आपला सोडचिठ्ठी देणाऱ्या खासदारांची नावेदेखील राघव चड्ढा यांनी सांगितली. पक्षाचा राजीनामा, विलिनीकरणाबद्दलची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली असून, राज्यसभेतील पक्षाचे दोन तृतीयांशपेक्षा जास्त खासदार भाजपमध्ये विलीन होत असल्याचे ते म्हणाले. राज्यसभेत आपचे एकूण १० खासदार असून त्यातील ७ जण चड्ढा यांच्यासह स्वाती मालीवाल, अशोककुमार मित्तल, संदीप पाठक, हरभजन सिंह, राजिंदर गुप्ता, विक्रमजीतसिंह साहनी हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.

विलिनीकरणाच्या कागदपत्रांवर सात खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले पत्र राज्यसभेच्या सभापतींना पाठवण्यात आले आहे. यावेळी चड्ढा यांच्यासह पक्ष सोडणारे अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक पत्रकार परिषदेला उपस्थित होते. पक्षात प्रचंड घुसमट होत आहे. आधी देशहिताचा विचार करणारा पक्ष आता केवळ वैयक्तिक हिताचा, फायद्याचा विचार करत आहे. त्यामुळे पक्षापासून दूर जात असल्याचा निर्णय घेतल्याचा दावा चड्ढांनी केला.

आप सोडून भाजपसोबत जात असल्याची घोषणा केल्यावर राघव चड्ढा, अशोक मित्तल आणि संदीप पाठक यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली आणि तिघांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. नवीन यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. काही दिवसांपूर्वीच मित्तल यांच्या मालमत्तावर ईडीचे धाडसत्र सुरू झाले होते. त्यामुळे त्यांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

# खुशखबर! यंदा मान्सून लवकर दाखल होणार!

## मे अखेर मान्सून दक्षिण भारतात दाखल होणार?

● **नवी दिल्ली । वीरभूमी** – युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्टने आज मान्सूनबाबत अहवाल जारी केला. त्यानुसार मे महिन्याच्या अखेरीस मान्सून दक्षिण भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. मान्सून सर्वप्रथम केरळमध्ये दाखल होईल आणि नंतर उत्तर भारताच्या दिशेने पुढे सरकेल. त्याआधी अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सून १८ ते २५ मेदरम्यान दाखल होण्याची शक्यता आहे तर केरळमध्ये २५ मेच्या आसपास दाखल होण्याची शक्यता आहे.

हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार यावेळी मान्सून लवकर येण्यामागे अल् निनोची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता कमी असणे हे एक कारण आहे. त्याचबरोबर पॉझिटिव्ह इंडियन ओशन डायपोलमुळेही पाऊस लवकर पडण्याची आणि मान्सून लवकर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण देशातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. तसेच नागरिकांना उकाड्यापासून दिलासाही मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सध्या राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अनेक भागात वादळी वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे घरांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात अडकला आहे तर राज्याच्या काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवत असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे नागरिकही त्रस्त आहेत.

काही दिवसांपूर्वी भारतीय हवामान विभागाने २०२६ मध्ये भारतात मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तवली होती. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार जून ते सप्टेंबर या दक्षिण-पश्चिम मान्सून हंगामात देशभरात पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९० ते ९५ टक्के राहू शकतो. यामुळे काही भागात शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

# पेटीएम पेमेंट्स् बँकेचा परवाना रद्द

● **मुंबई । वीरभूमी** – रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २४ एप्रिल शुक्रवार रोजी पेटीएम पेमेंट्स बँक लिमिटेडविरोधात कारवाई करीत पेटीएम पेमेंट्स् बँकेचा बँकिंग परवाना तात्काळ रद्द केला. आरबीआयने हा निर्णय बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या कलम २२ (४) द्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करत आरबीआयने घेतला.

पेटीएम पेमेंट्स बँकेचे कामकाज सुरु राहणे हे सार्वजनिक हितासाठी, ठेवीदारांसाठी नुकसान करणारे ठरू शकते. या पेमेंट्स बँकेचे कामकाज ज्या प्रमाणे सुरू आहे, त्यामुळे ठेवीदारांना नुकसान सहन करावे लागू शकले असते. पेटीएम पेमेंट्स् बँक त्यांना ज्या अटींसह परवाना दिला होता, त्याचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्याचे आरबीआयने म्हटले आहे.

पेटीएम पेमेंट्स् बँकिंग रेग्यूलेशन कायद्याच्या कलम २२ (३) नुसार विविध निमयांचे पालन करू शकलेली नाही. आरबीआयच्या आदेशानंतर पेटीएम पेमेंट्स् बँकेला हायकोर्टात कामकाज बंद करण्यासाठी अर्ज करावा लागेल. आरबीआयने पेटीएम पेमेंट बँकेला ११ मार्च २०२२ ला नव्या ग्राहकांची खाती उघडण्यास मनाई करण्यात आली होती.

# चौथ्या दिवशीही संप तीव्र; कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

## सरकारी कर्मचाऱ्यांचा रणरणत्या उन्हात आक्रोश । शासनाविरोधात घोषणाबाजी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सुरू असलेला संप चौथ्या दिवशी अधिकच तीव्र झाला असून, कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि. २४ एप्रिल) जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढत आपला आक्रोश व्यक्त केला. अद्यापही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय न झाल्याने आंदोलकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जलसंपदा विभागाच्या कार्यालयात एकत्र येत या मोर्चाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून मार्गक्रमण करत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. भर दुपारी कडक उन्हातही कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलकांनी आपला संताप व्यक्त केला.

या मोर्चात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, अशोक मासाळ, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनिल पंडित, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, दिपक चन्ने, उषा पारधी, आप्पासाहेब जगताप, प्रसाद साठे, प्रमोद सूर्यवंशी, प्रमोद जोशी, शंकर जगताप, दुर्गा हरेल, कविता लोखंडे, शुभांगी खरात, अश्विनी खरपुडे, गंगासागर उगले, अनिता पवार, अमोल ठाणगे, राजेंद्र आंधळे, रवींद्र वाव्हळ, मृदुला भोर, बाळासाहेब निवडुंगे, भगवान सानप, सौ. नेमाने, स्वाती राठोड, वनश्री खजिनदार, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह मोठ्या संख्येने कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संपाचा मार्ग स्वीकारावा लागला आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तातडीने भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे यांचा समावेश आहे. केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. एकूण




१८ मागण्यांचा समावेश या आंदोलनात असून, त्या तातडीने मान्य कराव्यात, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

यावेळी अशोक मासाळ यांनी शासनाच्या धोरणांवर तीव्र टीका करत सांगितले की, सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय होत आहे. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागणार आहे. त्यांच्या उतारवयाची सुरक्षितता हिरावली जात असून, उतारवयात कर्मचाऱ्यांना रस्त्यावर भाजी विक्रीची वेळ येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिला कर्मचाऱ्यांनीही या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कडक उन्हातही महिला रस्त्यावर उतरल्याने सरकारने त्यांच्या अडचणींचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली. महिलांच्या हक्कांबाबत बोलणाऱ्या सरकारने प्रत्यक्षात सेवेत असलेल्या महिलांची परिस्थिती लक्षात घ्यावी, असेही आंदोलक महिलांनी भूमिका मांडली.

## SPOT NEWS

### मधुमित्र मधुसखी पुरस्कारासाठी नामांकन प्रक्रिया सुरू ४ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत २०२६ सालासाठी मधुमित्र व मधुसखी पुरस्कार योजनेअंतर्गत नामांकन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधमाशीपालन व्यवसायात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी आपले नामांकन अर्ज दि. ४ मे २०२६ पर्यंत संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत करण्यात आले आहे. मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. त्यापैकी एक पुरस्कार महिलांसाठी राखीव असून, अनुक्रमे ११ हजार, ९ हजार आणि ५ हजार रुपये अशी रोख रक्कम देण्यात येणार आहे. दि. २० मे २०२६ रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठीची सविस्तर माहिती व अर्ज मंडळाच्या www.mskvib.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील खादी मंडळाच्या कार्यालयातही नामांकन अर्ज मिळणार आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा कार्यालय दूरध्वनी : ०२४१–२३५३४१० तसेच संचालनालयाच्या ०२१६८–२६०२६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# पाणीटंचाई, उष्माघाताबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । कर्जत - जामखेड येथे जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय कामकाजाचा आढावा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

कर्जत व जामखेड तालुक्यात उन्हाची वाढती तीव्रता, संभाव्य अवकाळी पाऊस व टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने सतर्क राहून पशुधन व नागरिकांना दिलासा द्यावा. प्रलंबित कामे मुदतीत पूर्ण करून पाणी व चारा टंचाईबाबत तातडीने उपाययोजना अमलात आणाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



कर्जत व जामखेड तालुक्यांच्या दौऱ्यात विविध शासकीय कार्यालये व प्रकल्पांना दिलेल्या भेटीप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या दौऱ्यात त्यांच्या समवेत प्रांताधिकारी नितीन पाटील, पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रशांत वाकचौरे, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट व उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. महारुद्र खरपाडे यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर उष्माघात कक्षात केवळ पंख्यांवर अवलंबून न राहता रुग्णांसाठी तातडीने कुलरची व्यवस्था करण्यात यावी. मागील सहा महिन्यांपासून बंद असलेल्या शस्त्रक्रिया कक्षाची दुरुस्ती करून तो तात्काळ सुरू करण्यात यावा. नैसर्गिक पाण्याचे जलस्रोत, पाण्याची पातळी व पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी संयुक्त कारवाई करावी.

जामखेड येथे राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणाबाबत बैठक घेऊन त्यांनी संबंधित यंत्रणांना कार्यवाहीचे निर्देश दिले. पंचायत समिती सभागृहात पाणीटंचाईग्रस्त गावांतील सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांच्यासोबत बैठक घेऊन मागणीनुसार तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले. कर्जत तहसील कार्यालयात प्रशासनातील सर्व विभाग प्रमुखांची टंचाई आढावा बैठक घेत खते, बियाणे व आरोग्य विभागाचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

निमगाव डाकू येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाला भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध असून उर्वरित कामे ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. रातंजन येथील लोकसहभागातून तयार केलेल्या शिवरस्त्याची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. टाकळी खांडेश्वरी येथे बांबू शेती प्रकल्पाला भेट दिली व कृषी विभागाच्या योजनांबाबत माहिती घेतली. दौऱ्यादरम्यान ५० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाची पाहणी करून कामाची गती वाढविण्याचे त्यांनी निर्देश दिले.

प्रशासकीय समन्वय राखत सर्व अधिकारी, विभाग प्रमुखांनी बैठका व क्षेत्रीय भेटींना स्वतः उपस्थित राहावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

मिरजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पाहणीत माता व बालसंगोपन कार्यक्रमांतर्गत निश्चित प्रसूती उद्दिष्टाच्या तुलनेत प्रसूतीचे प्रमाण कमी असणे ही चिंतेची बाब असून जनजागृतीपर कार्यक्रम राबवून यात सुधारणा करावी. माहेजी येथील प्रस्तावित स्थलांतर प्रक्रियेबाबतही त्यांनी चर्चा केली.

## महापुरुषांना केवळ नाम घोषापुरते मर्यादा ठेवू नका : डॉ. मिलिंद कसबे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महात्मा ज्योतीबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचून समजून घेणे काळाची गरज आहे. आपल्या महापुरुषांना केवळ श्रद्धेचा विषय बनवू नका किंवा त्यांना केवळ नामघोषात अडकवू नका; तर ते विचार कृतीचा भाग बनवा, असे प्रतिपादन डॉ. मिलिंद कसबे यांनी केले.



अहिल्यानगर येथील सैनिकी कॅम्प मध्ये आयोजित केलेल्या संयुक्त जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कसबे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्या महापुरुषांना जाती–जातीत बंदिस्त केल्याने मोठी संस्कृतिक हानी झाली आहे. महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांनी कोणत्या जातीचा द्वेष केला नाही. मात्र प्रत्येक जातीत असलेल्या दैववादी, अंधश्रध्देला त्यांनी विरोध केला. त्यामुळे त्यांचे कार्य व्यापक होते, असे ते म्हणाले.

पुढे त्यांनी सांगितले की, भारताच्या कृषी धोरणाचा तसेच व्यापार आणि उद्योगाचा पाया महात्मा फुले यांनी रचला आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या वीज, जल आणि कृषि धोरणत फार मोलाचे योगदान आहे. म्हणून या दोन्ही महापुरुषांचे भारताच्या पायाभूत विकासात अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे आहे. तरुणांना मोफत सैनिकी शिक्षणाबद्दल डॉ. आंबेडकरांनी आग्रह धरला होता. त्यांच्या कुटुंबात सैनिकी वारसा होता, त्यामुळे भारताच्या सुरक्षा आणि संरक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत चिंतन केले आहे. ते आजच्या पिढीने समजून घेतले पाहिजे असे विचार डॉ. कसबे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले.

अहिल्यानगर येथील संरक्षण नियंत्रणालयाच्या व्यतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे अध्यक्ष विभागाचे कंट्रोलर ब्रिगेडियर राजू चावला हे होते. या प्रसंगी भाऊसाहेब गायकवाड यांची यू.पी.एस.सी. मध्ये निवड झाल्याबद्दल विशेष पाहुणे म्हणून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात गिर्यारोहण प्रेमी व उद्योजक नितीन अवचर व दिलीप गायकवाड, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे संयोजन प्रकाश भोसले यांनी केले होते.

## कोपरगावच्या १३१.२४ कोटींच्या पाणी योजनेत अनियमितता; विभागीय आयुक्तांच्या समितीकडून चौकशी सुरू : राजेश मंटला यांची माहिती

**● पाथर्डी । वीरभूमी –**

नगरपालिकेच्या १३१.२४ कोटी रुपयांच्या पाणी योजनेच्या कामात अनियमितता आढळून आल्याने या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू करण्यात आली आहे. मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी नेमलेल्या चौकशी समितीची पहिली बैठक आज कोपरगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात पार पडली, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते राजेश मंटाला यांनी दिली.

कोपरगाव शहरातील नागरिकांना दररोज स्वच्छ, नियमित व मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते राजेश मंटाला यांनी थेट दिल्ली येथील पंतप्रधान कार्यालय तसेच नगर विकास मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर राज्याच्या नगर विकास मंत्रालयाकडून या योजनेसाठी १३१.२४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली.

मात्र, या योजनेचा कालावधी दोन वर्षांचा असतानाही काम वेळेत पूर्ण झाले नाही. यामुळे राजेश मंटाला यांनी नगर परिषद संचालनालय, मुंबई तसेच विविध शासकीय स्तरांवर उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली. त्यानुसार नगर परिषद संचालनालयाने मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांना चौकशी समिती नेमण्याचे निर्देश दिले.

सदर समितीमध्ये संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली अभियंता पंकज मुंगसे व इतर तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

आज झालेल्या बैठकीत पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली असून संबंधित कागदपत्रे समितीसमोर सादर करण्यात आली आहेत : दि. १८/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत दिलेल्या आदेशानुसार वेळेत कारवाई का झाली नाही?, तळे क्रमांक १ ते ४ साठी मंजूर १९ कोटी रुपयांच्या निधी असूनही खोलीकरण व मजबुतीकरण का झाले नाही?, तळे क्रमांक ५ मध्ये मंजूर कामापेक्षा सात फूट कमी खोदकाम का झाले? त्यातून वाचलेला निधी नगरपालिकेकडे जमा करण्यात आला का?, तलावातील खोदकामातून निघालेल्या गौणखनिजाचा उपयोग व त्यातून मिळालेले उत्पन्न किती?, मुदतीत काम पूर्ण न केल्याबद्दल ठेकेदारावर काय कारवाई व दंड करण्यात आला?, योजनेत प्रस्तावित सोलर प्लांट का उभारण्यात आला नाही? त्यामुळे वीजबिलाचा अतिरिक्त भार का पडला?, योजना अपूर्ण असतानाही संपूर्ण खर्च कसा करण्यात आला?, या प्रकरणासंदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेची स्थिती व निर्देश काय?, पाइपलाईनचे काम दर्जेदार झाले का, याबाबत आलेल्या तक्रारींची दखल घेण्यात आली का? तसेच, प्रत्यक्ष स्थळ पाहणी (स्पॉट व्हिजिट) केल्यानंतरच अंतिम अहवाल तयार करावा, अशी मागणी समितीकडे करण्यात आली. मात्र, समितीने तत्काळ पाहणी न केल्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात आली असून याबाबत नगर परिषद संचालनालय व इतर शासकीय अधिकाऱ्यांना ई–मेलद्वारे कळविण्यात आले आहे.

चौकशीची व्याप्ती मोठी असल्याने अजून तीन ते चार बैठका घेण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

शहराला दररोज स्वच्छ व नियमित पाणी मिळणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे, असे राजेश मंटाला यांनी सांगितले.

या बैठकीस राजेश मंटाला यांच्यासह संतोष गंगवाल, लोक स्वराज्य आंदोलनाचे ॲड. नितीन पोळ, भूमिपुत्र फाउंडेशनचे निसार शेख, शेतकरी कृती समितीचे तुषार विद्वांस, दीपक घोडले आदी उपस्थित होते.

# शिवाजी महाराजांचा अपमान प्रकरणी संजय गायकवाड यांची आमदारकी रद्द करावी

## भाकपच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर 'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे सामुदायिक वाचन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात आक्षेपार्ह, अश्लील वक्तव्य करुन प्रशांत आंबी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी तसेच त्यांचा आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन डिवायएसपी दिलीप टिपरसे यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत गृहमंत्री तसेच मुख्यमंत्री यांनाही निवेदन पाठविण्यात आले आहे. तसेच या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांना शिवाजी कोण होता? या पुस्तकाची भेट देण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामुदायिक वाचन करून गायकवाड यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, ॲड सुधीर टोकेकर, इंजि. प्रशांत पाटिल, संध्या मेढे, भैरवनाथ वाकळे, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, संजय वाघ, कॉ. फिरोज शेख, संजय झिंजे, अशोक सुर्यवंशी, कॉ. सुभाष कडलग, सुदाम लगड, विनायक गोरखे, राजु वैराळ, अनिल भोसले (भाकप माले राज्य सदस्य), प्रा. डॉ. महेबुब सय्यद, सोमनाथ केंजळे, युनुस तांबटकर, प्रविण सोनवणे, ॲड. विद्या जाधव, दुर्गेश भोसले, आर्कि. अर्शद शेख, कॉ. अविनाश साठे, बापु चंदनशिवे, राजेंद्र कर्डिले, श्याम शिंदे, दिपक शिरसाठ, बापूराव राशिनकर, संदीप इथापे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आमदार संजय गायकवाड यांनी बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री १२.५२ वाजता ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे माजी राज्य सेक्रेटरी प्रशांत आंबी यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या संदर्भात अत्यंत अश्लील व आक्षेपार्ह भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब लोकशाही मूल्ये व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी असल्याचे भाकपने स्पष्ट केले आहे.

यासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांनी अवमानकारक वक्तव्य करून महाराष्ट्राच्या श्रद्धास्थानाचा अपमान केल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. आमदार गायकवाड यांचे वर्तन हे आमदार पदाला शोभणारे नसून राज्याच्या राजकीय संस्कृतीला कलंक लावणारे असल्याची टीका करण्यात आली. शिवाजी कोण होता? हे पुस्तक इतिहासाचा चिकित्सक व अभ्यासपूर्ण दृष्टिकोन मांडणारे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टी, समता आणि ऐतिहासिक सत्य जाणून घेण्याची प्रेरणा



देणारे हे महत्त्वपूर्ण लेखन असल्याचे सांगण्यात आले. तसेच प्रबोधनकार ठाकरे यांनी १९२६ मध्ये दगलबाज शिवाजी हे पुस्तक लिहिले होते, तर गणेश कुऱ्हाडे यांनी १९३९ मध्ये शिवाजी कोण होता? हे पुस्तक लिहिल्याचा उल्लेखही करण्यात आला.

आमदार संजय गायकवाड यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा, जीवे मारण्याची धमकी, जातींमध्ये तेढ निर्माण करणे, महापुरुषांचा अपमान व महिलांविषयी अश्लील वक्तव्य या गंभीर गुन्ह्यांखाली गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्यात यावी, गोविंद पानसरे खून प्रकरणात आमदार गायकवाड यांची सखोल चौकशी करण्यात यावी, नगरमधील नगरसेवक श्रीपाद छिंदम प्रकरणाप्रमाणेच न्याय देत गायकवाड यांची आमदारकी रद्द करण्यात यावी आणि त्यांच्या सर्व अनधिकृत धंद्यांवर बंदी घालण्याची मागणी भाकपच्या वतीने करण्यात आली आहे.

लोकशाही व्यवस्थेत विचार मांडण्याचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे नमूद करत, अशा प्रकारच्या धमक्या व बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा भारतीय कम्युनिस्ट पक्ष व पुरोगामी संघटनांच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# निर्मळ मनाने केलेली सेवा ईश्वराला पावते : माधव बाबा

## पाथर्डीत शंकर महाराजांच्या ७९ व्या समाधी दिनानिमित्त भाविकांची मोठी उपस्थिती । भक्ती, सेवा व निष्ठेचा संदेश

**● पाथर्डी । वीरभूमी –**

ज्याचे मन निर्मळ असते त्याला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होते व त्याच्या मनात भक्तीची ताकद निर्माण होते. निर्मळ मनाने केलेली सेवा ईश्वरास पावते. सध्याच्या काळामध्ये समस्त जीवसृष्टी संभाव्य संकटांच्या भीतीने चिंतेत आहे. ईश्वराला शरण जा. मनोभावे सेवा करा. तीच शक्ती सर्व संकटांमधून तारून नेईल. शंकर महाराजांची सश्रद्ध मनाने केलेली सेवा कधीच व्यर्थ जात नाही. असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले.

येथील मठामध्ये शंकर महाराज यांचा ७९ वा समाधी दिन सोहळा राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत पारंपारिक पद्धतीने व धार्मिक वातावरणामध्ये उत्साहात संपन्न झाला.

पहाटे महाराजांच्या मूर्ती व पादुका वर अभिषेक करण्यात आला. नित्य पाठ होऊन आरती संपन्न झाली. सकाळी पालखी सोहळा उत्साहात सुरू झाला. खोलेश्वर मंदिरापासून वाजत गाजत निघालेली पालखी जय भवानी चौक, गांधी चौक मार्गे नवी पेठ मधून पुन्हा मठाकडे आली. रस्त्यामध्ये भाविकांनी पुष्पवृष्टी करत पालखीचे पूजन केले. शनेश्वर सेवा मंडळ व क्रांती चौक मित्र मंडळ यांच्यावतीने पालखी मिरवणुकी दरम्यान पिण्याचे पाणी व सरबताचे वाटप करण्यात आले. सोहळ्यासाठी सुरत, अहिल्यानगर, पुणे, नाशिक, मुंबई, वर्धा, अमरावती, बीड, कल्याण, ठाणे, सोलापूर अशा विविध भागातील भाविकांनी गर्दी केली. पुण्याच्या धनकवडी येथील मुख्यमठानंतर राज्यातील विविध भाविक पाथर्डीच्या मठामध्ये दर्शनासाठी उपस्थित राहतात. येथे शंकर महाराजांनी वापरलेला पलंग आहे. स्वप्नदृष्टांतानुसार काळ्या मार्बल मधील शंकर महाराजांची अत्यंत आकर्षक अशी मूर्ती असल्याने भाविकांना येथील सेवेची विशेष प्रचिती येते. शंकर महाराज स्वरूपात माधव बाबांची सेवा येथे येणारे भाविक करतात. नाशिक येथील उप अभियंता प्रल्हाद सोनवणे यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी विजय दरगोडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

यावेळी भाविकांना उपदेश करताना माधव बाबा म्हणाले, संपूर्ण जग सध्या युद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे मृत्यूच्या भयाने सर्वसामान्य माणूस भयग्रस्त झाला आहे. ईश्वराने जन्म दिला पूर्व पुण्याईने आपण भक्तिमार्गाकडे वळालो. त्यामुळे कोणत्याही संकटामध्ये तोच ईश्वर आपले रक्षण करेल. असा दृढ विश्वास ठेवा. निरपेक्ष भावनेने सेवा करा. सरळ व प्रामाणिकपणे वागा. व्यसनांपासून दूर राहा. परोपकारी, सेवाभाव ठेवा. शंकर महाराज जसे ठेवतील तसे राहण्याची मनाची तयारी करा. कुणालाही दुःखाचा लवलेश राहणार नाही. येथील मठामध्ये चैतन्य स्वरूपात महाराजांचे अहोरात्र वास्तव्य आहे ज्यांच्या नशिबात सेवाकार्य लिहिले आहे त्यांनाच येथील लाभ मिळतो. मनामध्ये ईश्वराविषयी निष्ठा भाव नसताना केलेली सेवा निव्वळ दिखाऊ पणा ठरतो. अशा सेवेने पुण्य लाभत नाही व फल सुद्धा मिळत नाही. ईश्वराकडे कृपा मागावी ईश्वराकडे सद्बुद्धी मागावी मात्र भाविक हे सोडून प्रापंचिक मागण्या मागत



बसतात. ईश्वराला सर्व काही कळते मागण्याची गरज नसते. तो फक्त आपला सेवाभाव निष्ठा व आचरण बघतो.

शंकर महाराजांचे बराच काळ पाथर्डी तालुक्यातील मिरी, वृद्धेश्वर, मढी अशा ठिकाणी वास्तव्य होते. महाराजांना सुद्धा तालुक्यातील अध्यात्मिक ऊर्जेने प्रसन्नचित्त केले होते. पाथर्डी तालुका नाथ भूमी, संतभूमी व ईश्वराचे अत्यंत जागृत अधिष्ठाण असलेली भूमी म्हणून सर्वत्र ओळखला जातो. शंकर महाराजांच्या आदेशाने पाथर्डीत सुरू झालेला मठ पाथर्डीकरांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरली आहे. नित्य मठामध्ये येत महाराजांपुढे फक्त डोके टेकवा. साधकाच्या जीवनामध्ये नैराश्य व अपयश कुठेही स्पर्श करणार नाही. भुकेलेल्या व्यक्तीला अन्न द्या. उन्हाळ्याचे दिवस आहेत. पशुपक्षी प्राणीमात्रांना सुद्धा अन्नपाण्याची गरज भागवा. मनुष्य जन्म दुर्मिळ असल्याने या जन्माचे सार्थक करण्यासाठी महाराजांची कृपा आपल्या वर होणार आहे, श्रद्धायुक्त अंतकरणाने केलेली सेवा जीवनाचा उद्धार करणारी ठरेल. हाच महाराजांचा संदेश प्रत्येकाने साधकांमध्ये प्रसारित करावा असे माधव बाबा म्हणाले.

# जनगणना कामकाज प्रामाणिकपणे पार पाडा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

## कर्जत तालुक्यात प्रगणक प्रशिक्षणाला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जनगणना ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक प्रगणकाने आपली जबाबदारी अचूक व प्रामाणिकपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.



राष्ट्रीय जनगणनेच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यात प्रगणकांना तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणास जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली तेव्हा ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, निवासी नायब तहसीलदार महादेव कारंडे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, नागरिकांशी संवाद साधताना नम्रता, विश्वासार्हता राखावी. प्रत्येक घरातील माहिती अचूकपणे नोंदवावी. जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी जबाबदारीची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे. समन्वय, सातत्य, शिस्त यांना प्राधान्य देऊन काम वेळेत पूर्ण करावे.

कर्जत तालुक्यात घरांची, कुटुंबांची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी सुमारे ६९ पर्यवेक्षक, ३५८ प्रगणकांची निवड करण्यात आली आहे. त्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण दिले जात आहे. दि. २३ एप्रिल २०२६ ते ०८ मे २०२६ या कालावधीत चार टप्प्यांत प्रशिक्षण आयोजित केले आहे. प्रत्येक टप्प्यात तीन दिवस सखोल मार्गदर्शन दिले जात आहे.

प्रशिक्षणात तांत्रिक बाबी, अर्ज भरण्याची पद्धत, माहिती संकलनातील अचूकता याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जात आहे. यावेळी संबंधित अधिकारी, प्रशिक्षणार्थी प्रगणक उपस्थित होते.

# दादाजी वैशंपायन जयंतीनिमित्त शेवगावात १ मे रोजी राज्यस्तरीय कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा

## अध्यात्मिक पुरस्कार नरेंद्रनाथ महाराज, सामाजिक पुरस्कार संतोष काकडे, मतीनजी भोसले, मुकुंद हटोटे यांना जाहीर

**● शेवगाव । वीरभूमी –**

गुरुदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच कला व क्रीडा संस्थेच्या वतीने प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.









यावर्षीचा अध्यात्मिक पुरस्कार श्रीनाथ शक्ती विद्यापीठ, अकोला येथील नरेंद्रनाथ महाराज यांना जाहीर झाला आहे. तसेच सामाजिक पुरस्कार अमरावती येथील निवासी जिल्हाधिकारी संतोष काकडे, मतीनजी भोसले आणि ठाणे येथील सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद हटोटे यांना जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके व सचिव फुलचंद रोकडे यांनी दिली.

गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने सन २०१० पासून दरवर्षी अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, दि. १ मे रोजी दुपारी ४ वाजता दादाजी वैशंपायन नगर येथील सभागृहात पार पडणार आहे.

या कार्यक्रमासाठी राम महाराज झिंजुर्के, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, शरदकाका वैशंपायन, मुख्याधिकारी विजया घाडगे, अनुदीप दिघे, डॉ. महेंद्र गौशाल, उद्योजक गिरीश साठे, शेवगावच्या नगराध्यक्षा माया मुंढे, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक, अरुण लांडे, नंदकुमार शेळके, रविंद्र पुसाळकर, प्रा. कचरदास सारडा, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, संजय फडके, वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष किसन चव्हाण, राहुल जावळे, ॲड. अभिजीत काकडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमासाठी भाविकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने अर्जुनराव फडके व फुलचंद रोकडे यांनी केले आहे.

# ‘सर्वसामान्यांची फसवणूक – मार्गदर्शन व उपाय’ पुस्तक ठरणार जनतेसाठी सुरक्षा कवच

## अण्णासाहेब हजारे । राळेगण सिद्धी येथे जागतिक पुस्तक दिनानिमित्त प्रकाशन

**● पारनेर । वीरभूमी–**

डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा विकास जसा सोयीस्कर ठरत आहे, तसाच तो आर्थिक फसवणुकीचे नवे धोकेही निर्माण करत आहे. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जागरूक व सक्षम करण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे यांनी लिहिलेले ‘सर्वसामान्यांची फसवणूक – मार्गदर्शन व उपाय’ हे पुस्तक महत्त्वाचे सुरक्षा कवच ठरेल, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी व्यक्त केली.

जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून गुरुवारी (दि. २३) राळेगण सिद्धी येथे अण्णा हजारे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी हे पुस्तक प्रत्येक नागरिकासाठी मार्गदर्शक व उपयुक्त असल्याचे नमूद केले.

गेल्या ३५ वर्षांपासून ग्राहक संघटनांच्या माध्यमातून आर्थिक फसवणुकीविरोधात कार्य करणारे विलास जगदाळे यांनी आपल्या अनुभवातून हे पुस्तक साकारले आहे. नागरिक आर्थिकदृष्ट्या साक्षर व्हावेत, हा या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे. पुस्तकासाठी अण्णा हजारे व आदर्श गाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी शुभेच्छा संदेश दिले असून, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

सध्याच्या डिजिटल आव्हानांचा विचार करून या पुस्तकात विविध प्रकारच्या फसवणुकींचा सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे. यामध्ये डिजिटल व ऑनलाईन आर्थिक फसवणूक, नोकरीच्या आमिषाने होणारी फसवणूक, बनावट अधिकारी बनून केली जाणारी फसवणूक, ऑनलाईन शॉपिंग व बँकिंग व्यवहारातील धोके, सोने–चांदी खरेदीतील फसवणूक, अन्न व औषधांमधील भेसळ, वजन–मापातील फसवणूक तसेच शेतीसाठी बियाणे व खते खरेदी करताना घ्यावयाची खबरदारी यांचा समावेश आहे.

याशिवाय, फसवणूक झाल्यास तक्रार कशी करावी, दाद कुठे व कशी मागावी, संबंधित कायदे कोणते आहेत आणि स्वतःची डिजिटल सुरक्षा कशी मजबूत करावी, याचीही सविस्तर माहिती पुस्तकात देण्यात आली आहे. त्यामुळे हे पुस्तक




प्रत्येक कुटुंबासाठी संग्रही ठेवण्याजोगे मार्गदर्शक ठरणार आहे.

या प्रकाशन सोहळ्यास अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी, शिक्षक हरिभाऊ चौधरी, बाजीराव जगदाळे, पत्रकार भगवान गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक नागरिकांसाठी उपयुक्त ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.